Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 262 – 268

DOI: 10.5281/zenodo.10121583

Original Research Article

# महात्मा गांधीजीचे ग्राम स्वराज्य व ग्रामविकास संदर्भात विचार

डॉ. विठ्ठल घिनमिने

सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, श्री. साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर ता. हिंगणघाट, जि. वर्धा ४४२३०७ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: vghinmine1980@gmail.com

Received: 17 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

**गोषवारा**

महात्मा गांधीजीची ग्रामस्वराज्य व ग्रामविकासाची संकल्पना अभ्यासल्यास असे दिसून येते कि, ग्रामीण विकासाच्या संदर्भात त्यांनी अतिशय समर्पक भूमिका मांडली आहे. ग्रामीण भागामध्ये परंपरागत व्यवसायाची आवश्यकता नैसर्गिक व मानवीय संसाधना योग्य उपयोग करणे गरजेचे आहे. गांधीजीनी ग्रामीण विकासाबाबत संकल्पना म्हणजे भारतीय ग्रामीण समाजाच्या गरजा भागविण्याचे आणि ग्रामीण भागात रोजगार तथा समृद्धी निर्माण करण्याचे आचार प्रधान तत्वज्ञान आहे. गांधीजीचे तत्वज्ञान आपल्या देशाच्या पुरातन व्यवसायावर तथा परंपरेवर आधारित असले तरी ते पूर्णपणे परंपरावादी नाहीत उलट परिवर्तनशील व प्रगतीवादी आहे. ग्रामीण भागातील आरोग्याचे प्रश्न सोडविण्यासाठी स्वच्छ पिण्याचे पाणी, प्राथमिक आरोग्य केंद्र, गावातील वादविवाद, तंटे सोडविण्यासाठी तंटामुक्ती समिती, निर्माण करणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे गांधीजीच्या वरील संकल्पनेचा विचार होणे आवश्यक आहे. ग्रामविकासाकरीता वर्तमानकाळातील जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरनाच्या नव्या युगात गांधीजीच्या विचाराची त्यांच्या संकल्पनेची नितांत आवश्यकता आहे.

**बीज शब्द:** आर्थिक संरचना, आर्थिक उन्नती, बहुसुत्री, आर्थिक विकेंदीकरण, जातीय ऐक्य, चरितार्थ, सक्षमता.

## प्रस्तावना

भारतीय अर्थव्यवस्था ही ग्रामीणक्षेत्र प्रधान आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार १२१ कोटी लोकसंख्येच्या ५८.२ टक्के लोकसंख्या ७.५ लाख गावामध्ये वास्तव्य करित होती. या ग्रामीण लोकसंख्येचे एकूण देशाअंतर्गत उत्पादनात ५१ टक्के योगदान आहे. एकूण घरगुती उत्पादन कृषीचा हिस्सा २०१९-२० या वर्षात 13.४ टक्के प्रतिशत असून भारतीय शेती जगातील एकूण लोकसंख्यापैकी १७ टक्के लोकसंख्येचे पोषण करित असते. भारताच्या सामाजिक, आर्थिक विकासामध्ये ग्रामीण क्षेत्राचा विकास महत्वपूर्ण घटक आहे. त्यामुळे खेडयाच्या विकासावर ग्रामीण विकास अवलंबून आहे. त्यामुळे राष्ट्रपिता महात्मा गांधीजीनी भारताचे खरे दर्शन खेड्यातच घडते असे म्हटले होते. म्हणूनच देशाचा जर सर्वांगिण विकास साधायचा असेल तर खेडयाला स्वयंपूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे गांधीजीनी खेड्याकडे चला अशी हाक दिली होती. खेडे हा देशाचा आत्मा असून कोणताही देश खेडयाला विकासापासून दूर ठेवून आपला विकास साध्य करू शकत नाही. त्यामुळे खेडयाचा विकास तर देशाचा विकास असे गांधीजींना वाटत होते.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ग्रामीण विकासाठी महात्मा गांधीजीचे विचार कशाप्रकारे सहाय्यक आहेत. यांचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केलेला असून यामध्ये ग्रामस्वराज्य ही संकल्पना समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ग्राम स्वराज्याचा अर्थ

महात्मा गांधीजीचा खेडयांना आर्थिक प्राधान्य देण्याचा प्रयत्न असे कारण त्यांना खेडे हे देशाचा आत्मा आहे असे वाटत होते. ‘ग्रामस्वराज्य’ ही आदर्श समाजाकडे जाण्याची एक प्रथम अवस्था आहे असे ते मानत. गांधीजींनी ग्रामस्वराज्य रामराज्याची कल्पना विशद केली त्यांनी सन १९३७ च्या ‘हरिजन’ मधील लेखात आदर्श खेड्याची संकल्पना मांडली. कोणताही देश आर्थिक, सामाजिक, व मानसिक नैतीकदृष्ट्या सक्षम झाल्याशिवाय ग्राम स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात अस्तित्वात येवू शकत नाही. अशी गांधीजीची धारणा होती.

## गांधीजीचे ग्राम स्वराज्य

गांधीजीच्या मध्ये ग्रामस्वराज्यात गाव हे संपूर्णपणे स्वयंपूर्ण सत्ता भोगणारे विकेंद्रित राहून प्रत्येक व्यक्तीचा सरकारमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग राहील. व्यक्तीच आपल्या सरकारचा निर्माता राहील. गावाचा कारभार चालविण्यासाठी दरवर्षी गावातील पाच व्यक्तीची निवड करण्याचा अधिकार राहील. गाव संपूर्णपणे स्वयंपूर्ण असतील म्हणजेच गावातच वस्तूचे उत्पादन, वितरण व उपभोग पूर्ण होतील याशिवाय गावातच लघु व कुटीर उद्योगाचा माध्यमातून विविध वस्तूचे उत्पादन होतील आणि त्याद्वारे गावातील गरजा पूर्ण होतील. गांधीजींना आदर्श खेडे हीच संकल्पना अभिप्रेत होती. त्यासाठी त्यांनी १९२० मध्ये ग्रामविकासाचा कार्यक्रम सेवाग्राम येथे सुरु केला. त्यानंतर त्यांनी १९३८ मध्ये वर्धा येथे या कामास प्राधान्य दिले. गांधीची शिक्षणाला व्यक्तिमत्व विकासाचे साधन मानत प्रत्येक गावामध्ये शिक्षणाची व्यवस्था असलीच पाहिजे यावर गांधीचा भर होतो. शिक्षण हे बहूजनाच्या उत्कर्षाचे साधन आहे. असे म्हणत अस्पृशता निवारणाला गांधीजीनी आपल्या जीवनात प्राधान्य दिले. अस्पृश्तेमुळे भारतीय समाज कमकुवत

बनला असून अस्पृशता मानव जातीवरचा कलंक आहे. आणि तो नष्ट करण्यासाठी अथक प्रयत्न केले पाहिजे असे गांधीजीचे स्पष्ट मत होते.

**ग्रामीण विकासाची संकल्पना**

ग्रामीण विकासाची निश्चित अशी व्याख्या करता येत नाही. कारण विकास हा शब्द काळानुसार बदलणारा दिसून येतो. अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून आर्थिक कल्याण, आर्थिक विकास आणि आर्थिक प्रगती अशा प्रकारे संक्रमण झाल्याचे दिसून येते. कोणत्याही देशाच्या विकासावर भौगोलिक, राजकीय, आर्थिक तसेच मानसिक घटकाचा प्रभाव पडत असतो. याशिवाय तेथील जनतेच्या सामाजिक, सांकृतिक जडणघडणीचा देखील प्रभाव पडत असतो. विकास प्रक्रियेत जनतेचे सहकार्य अभिप्रेत असते. कोणताही देश देशातील लोकांच्या इच्छेशिवाय विकास करू शकत नाही. म्हणूनच ग्रामीण विकासासाठी आर्थिक, सामाजिक व राजकीय व्यवस्थेत मुलभुत बदल होणे आवश्यक आहेत. ग्रामीण विकासाच्या संकल्पनेत ग्रामीण विकासाचे मूळ उद्देश पाहणे आवश्यक आहे.

१. ग्रामीण जनतेचा जिवनामानाचा स्तर वृद्धीगत करण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, रोजगार, इत्यादी बाबींची उपलब्धता करण्यात यावी.
२. कृषी उत्पादनात उत्पादकता वाढवून ग्रामीण दूर करण्यात यावे.
३. ग्रामीण विकास नियोजनाच्या माध्यमातून करण्यात येवून या विकासाच्या प्रक्रियेत लोकांचा सहभाग वाढवावा.
४. समाजात सर्वांना समान न्याय व संधीची उपलब्धता निर्माण करण्यात यावी.

वरील उद्देशाची पूर्तता करताना ग्रामीण विकासाद्वारे तेथील वास्तवात असणा-या लोकसंख्यांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास करणे आवश्यक आहे. या विकास प्रक्रियेत कृषी विकास करणे आवश्यक आहे. या विकास प्रक्रियेत कृषी विकास, लोकाना पूर्णवेळ रोजगार, राहण्यासाठी पक्की घरे, शिक्षणाच्या सोयी, आरोग्य सुविधा, दळणवळणाची साधने, टिकाऊ रस्ते, याशिवाय सामाजिक आर्थिक संरचनेत परिवर्तन यासारख्या बाबींचा समावेश होण्याची आवश्यकता आहे. वास्तविक पाहता ग्रामीण विकास ही एक बहुउद्देशीय प्रक्रिया आहे. ज्यामध्ये ग्रामीण जनतेच्या सामाजिक व आर्थिक स्तरावरील ऊर्ध्वकालीन परिवर्तन होणे. म्हणजेच त्यांच्या स्तरामध्ये सुधारणा होणे अभिप्रेत आहे. समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांच्या विकास करून त्याना मूळ प्रवाहात आणणे आवश्यक आहे.

**महात्मा गांधीजीचे ग्रामीण विकासासंदर्भात विचार पुढीलप्रमाणे आहेत**

**ग्रामविकास**

महात्मा गांधीजींना ग्रामीण विकासासाठी ग्रामीण विकासाची एक आदर्श संकल्पना अपेक्षित होती. त्याच उद्देशाने त्यांनी ग्राम स्वराज्याची संकल्पना मांडली त्यांनी खेड्याकडे चला हा मूलमंत्र दिला खेडे समृद्ध झाले तर भारताचा विकास निश्चितच होईल याच हेतूने त्यांनी ग्रामीण समाजाच्या विकासासाठी सुधारात्मक तेरा कलमी कार्यक्रम अमलात

आणण्यासाठी सांगितले होते. या कार्यक्रमाद्वारे भारतातील ग्रामीण समाजातील समस्याचे निवारण होईल असा त्याना विश्वास होता. गांधीजीनी या कार्यक्रमाचा सतत पाठपुरवठा केला आणि त्यासाठी त्यांनी अनेक विधायक कार्य हाती घेतले. त्यामध्ये ग्रामीण पुन:निर्माण, नई तालीम, प्रौढ शिक्षण, स्त्री सुधार, आरोग्य सुधार, स्त्री विकासाचे आणि स्त्रियांना आत्मनिर्भर बनविण्याचे विविध उपाय, ग्रामउद्योग विकास, खादीचा प्रसार, ग्रामसफाई, आदीवासी कल्याण व त्यांची आर्थिक उन्नती, धार्मिक व जाती ऐक्य, राष्ट्रभाषेचा प्रसार व प्रचार, मातृभाषेचा विकास अशा प्रकारचे बहुसुत्री कार्यक्रम गांधीजीनी ग्रामीण विकासाच्या दृष्टीकोनातून सांगितली आहेत. या वरील बहुसुत्री कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण विकास साधला जाऊ शकतो. असे गांधीजीना वाटायचे म्हणूनच त्यांनी या विधायक कार्यक्रमाला महत्व दिले.

पूर्वीच्या काळामध्ये आपल्या देशातील गावे आर्थिक, सामाजिक आणि सांकृतिक दृष्टीकोनातून स्वयंपूर्ण व स्वावलंबी होती. गांधीजीनी उन्नतीसाठी ग्रामविकास महत्वपूर्ण मानला आहे. प्रत्येक गाव स्वयंपूर्ण राहतील आणि सहकार्य हाच त्यांचा आधार राहील. गावातील लोक शांततापूर्ण भेदभावरहित गौरवशाली जीवन व्यथीत करतील. प्रत्येक गावामध्ये ग्रामपंचायत राहील त्यात स्त्री-पुरुष समानता राहील. स्त्रीयांना आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय दृष्ट्या पुरुषाबरोबर समान दर्जा प्राप्त होईल. गावपातळीवर तंटा, भांडणे, कलह व द्वेष नसतील अशा पद्धतीने गावात अहिंसात्मक समाजाची स्थापना होवून तंटामुक्त गावाची निर्माती होईल असे महात्मा गांधीजीनी संकल्पना होती. आपण गांधीजीची १५० जयंती मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरी केली. आज गांधीजीच्या विचाराची आवश्यकता भारताच्या विकासासाठी आहे. गांधीजीनी गावाकडे चला ही संकल्पना पूर्णत्वास येताना दिसत नाही. संध्या खेडी ओस पडत चालली आहे. लोक शहराकडे धाव घेत आहे. त्यामुळे शहरे मोठे होत आहे. शहराची लोकसंख्या वाढत आहे. शहरातील वातावरण प्रदूषित होत आहे. शहरामध्ये प्रदुषणाची समस्या सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. शहरातील भूखंडाच्या घराच्या किमती मोठ्या वाढलेल्या असून यांच्या सर्वाधित फायदा श्रीमंत वर्गाला झालेला दिसून येतो. याशिवाय शहरामध्ये मोठ्या प्रमाणात गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. खेड्यातील कुशल श्रमीक वर्ग शहरात स्थलांतरीत झालेला आहे. गावातील परंपरागत व्यवसाय बंद पडलेला आहे. त्यामुळे परंपरागत साधनाची जागा आधुनिक यंत्रांनी घेतली आहे. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण ग्रामीण भागात खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. ग्रामीण तरुण नैराश्यग्रस्त झालेला दिसून येते. याशिवाय समाजातील संयुक्त कुटुंब पद्धतीचा –हास होऊन विभिन्न कुटुंब पद्धती अस्तीत्वात आली त्यामुळे कुटुंबातील संबंध, कलह वाढल्याचे दिसून येतात. समाजात एकामेकाविषयी आदर, आस्था, प्रेम कमी होताना दिसून येतो. वृद्धाच्या समस्या समाजात वाढत असून वृद्धाश्रमात वृद्धांची संख्या वाढत चालली आहे. ग्रामीण भागातील परंपरागत व्यवसाय डबघाईला आल्यामुळे ग्रामीण भागात बेरोजगारीचे प्रमाण वाढले असून महात्मा गांधीजीच्या संकल्पनेतील भारत दिसून येत नाही.

**१. लघुद्योग**

महात्मा गांधी यांनी ग्रामीण भागातील पारंपारिक उद्योगांना ग्रामस्वराज्यात अधिक प्राधान्य दिले कारण कि, पारंपारिक उद्योग हे अल्प भांडवल व गुंतवणूक करून शक्य असते.

त्यासाठी गुंतवणूकीचे व उच्च दर्जाचे प्रशिक्षण घेण्याची आवश्यकता नाही अशा प्रकारचे उद्योग मार्गानुसार उत्पादन करू शकतात. सर्वसामान्य परिस्थितीत वस्तूची टंचाई निर्माण होत नाही. त्यामुळे महात्मा गांधी ग्रामीण उद्योगांना आदर्श मानले होते.

**२. खादी व ग्रामोद्योग**

महात्मा गांधी यांनी खादीवर अधिक भर दिला होता ग्रामोद्योग निर्माण होण्यासाठी गांधींनी खादी व ग्रामोद्यागाचा संख्या जास्त आहे व ही सर्व खेडी समृद्ध होतील तेव्हा ख-या  अर्थाने देशाचा विकास होईल असे महात्मा गांधी यांचे मत होते.

महात्मा गांधी म्हणतात बेकारी दूर होण्याचा उपाय म्हणजे खादी व ग्रामोद्योग होय. गावाकडील आवश्यक वस्तूची निर्माती गावातच करणे म्हणजे ग्रामोद्योग होय यामुळे गाव स्वावलंबी बनेल. ग्रामोद्योगात चरखा, हातमाग खादी तयार करणे, तेल घाणा, लाकडी वस्तूंची निर्मिती अशी अवजारे तयार करणे असे उपक्रम ग्रामोद्योगात मोडतात.

**३. सहकार**

महात्मा गांधी यांनी 'सहकार' या संकल्पनेस ग्रामस्वराज्य अधिक महत्व दिले आहे ते असे म्हणतात कि, सहकाराच्या अवलंबनाने सर्वांचा विकास होत असतो व सहकारात सामुहिक भावनाचा आविष्कार होतो. सहकारातून सर्वांगीण विकास साधला जातो सर्वाना समान संधी प्राप्त होते. सर्वाना समान अधिकार मिळतो. सहकारामुळे खेड्यामध्ये उद्योग निर्माती करता येते व खेड्यांना आर्थिक स्तर उंचावेल व यातूनच देशाच्या आर्थिक विकास होईल. अशा या सर्व दृष्टीने विचार करून महात्मा गांधी यांनी ग्रामस्वराज्य सहकाराचा समावेश केला आहे.

**४. स्वदेशी**

महात्मा गांधी यांच्या मते, स्वदेशी वस्तूच्या वापराने देशाची अर्थव्यवस्था बळकट होईल व स्वदेशीच्या वापराने ग्रामीण भाग हा आर्थिक दृष्ट्या भक्कम होईल. म्हणून गांधी यांनी स्वदेशीला ग्रामस्वराज्याचा आधारस्तंभ मानला त्यांनी कल्पनेतेने स्वदेशीच्या अवलंब करत स्वदेशीच्या प्रसार व प्रचार केला. त्यांच्या मते ज्या वस्तूचे उत्पादन करण्यासाठी भांडवल, कौशल्य व व्यवस्थापन नियंत्रण भारतीय असेल ती वस्तू स्वदेशी होय. स्वदेशीच्या व्यापक अर्थ स्पष्ट करताना गांधी म्हणतात भांडवल व तंत्रज्ञान वापरता येईल मात्र हे सर्व भातीयांच्या हितासाठी केलेला असावा. कारण कि स्वदेशीने ब्रिटीश साम्राज्याची आर्थिक कोंडी होईल व ग्रामस्वराज्य निर्माण होण्यासाठी मदत होईल.

**५. आर्थिक विकेंद्रीकरण**

विकेंद्रीकरणात खादी व ग्रामोद्योगांची भूमिका महत्वपूर्ण असेल आर्थिक संरचना अशी असावी कि, बहुतांश वस्तूची निर्मिती गाव पातळीवरच झाली पाहिजे कारण की कच्चा माल व त्यावर प्रक्रिया करून पक्का माल गावातच तयार झाला पाहिजे त्यातूनच पूर्व गाव स्वावलंबी बनेल व  अर्थव्यवस्था सुधारेल.

ग्रामस्वराज्याच्या विचारात महात्मा गांधी यांनी राजकीय सत्तेच्या विकेंद्रीकर्णाची प्रक्रिया सांगितली आहे. ते म्हणतात गावाचा कार्यभार पाहण्यासाठी पंचायत असेल ही पंचायत कायदेविषयक, न्यायविषयक, काम करेल तसेच राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रश्न पंचायतीमार्फत सोडविले जातील यातूनच ग्रामीण विकासात आर्थिक, सामाजिक व राजकीय बदल होतील व आपोआपच ग्राम स्वराज्य निर्माण होईल.

**श्रमप्रतिष्ठा**

गांधीच्या मते प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या चरितार्थ भागविण्यासाठी श्रम केले पाहिजे सर्वांनी श्रम केल्याशिवाय श्रमाला प्रतिष्ठा मिळवून ग्रामस्वराज्य निर्माण होणार व तसेच इतरांनी श्रम करणा-याचे अनुकरण केले तर श्रमाची प्रतिष्ठा अजून वाढेल.

गांधीजी म्हणतात, बहुतांशपणे समाजव्यवस्थेत कामाच्या बाबतीत श्रेष्ठ, कनिष्ठ दर्जा विशद केला जातो. वास्तविक पाहता श्रमाच्या बाबतीत असे वर्गीकरण चुकीचे आहे. प्रत्येक व्यक्ती जर स्वकष्टाने स्वतःच्या उत्पन्नातून स्वत:चे अन्न सेवन करीत असेल तर अन्नधान्याची तसेच खाद्य पदार्थांची टंचाई कधीही असणार नाही व रोगराई वाढणार नाही व त्यामुळे आजारपण येणार नाही सर्व नागरिक ग्रामस्वराज्यात श्रमजीवी असतील तर कोणी श्रेष्ठ व कनिष्ठ असणार नाही सर्वत्र समानता येईल आणि देशाच्या विकासाला हातभार लागले.

**संदर्भ सूची**

१. हरिप्रसाद व्यास- ग्राम स्वराज्य, नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद, पान क्र. ०३ आणि ३१.

२. भारतरन कुमारप्पा- सर्वोदय, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद पान क्र. २२ आणि १९६.

३. राजू श्रीरामे- आर्थिक विचारांच्या इतिहास, सर साहित्य केंद्र, नागपूर पान क्र. १९५ ते २१२.